

# महिषासुर मर्दिनी दुर्गा भवानी
# श्री सप्तशृंग निवासिनी श्री सप्तश्रृंगी माता

श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट | पी.टी.आर. नं. ए. ४६९

• ॐ सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके। शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ।। •



## ॥ अक्षय तृतीया ॥

• पूजन विधी, उपाय व दान •



हिंदू सणांपैकी '**अक्षय तृतीया**' हा एक महत्वाचा सण आहे. अक्षय तृतीया वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षाच्या तृतीयेला साजरी केली जाते. शुक्लपक्ष म्हणजे अमावस्या नंतरचे १५ दिवस ज्यामध्ये चंद्राचा आकार हळूहळू वाढत जातो. अक्षय तृतीया शुक्ल पक्षातच येते व त्यास 'अखाजी' देखील म्हणतात. **अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त समजला जातो.**

**अक्षय तृतीयेला कसमादे परिसरातील व खान्देशी बांधव मातीची नवीन केळी/करा (म्हणजेच घागर) कुंभाराकडून आणून किंवा तांब्याच्या घागरीची देवघरात पूजा मांडतात. त्यावर खरबुजाचे फळं तसेच पुरणपोळीचा (मांडे) नैवेद्य अर्पण करतात. तसेच हा पितरांचे ऋण फेडण्याचा दिवस आहे. ह्याच पवित्र अशा दिवशी पितरांना नैवेद्य अर्पण केला जातो. ही शुभतिथी प्रमाणे पितृतिथी आहे.**



अक्षय चा अर्थ होतो जो कधीही नष्ट होणार नाही. म्हणून असे म्हटले जाते की अक्षय तृतीया या तिथित सौभाग्य आणि शुभ फळाची प्राप्ती होते. या दिवशी केले जाणारे कार्य मनुष्याच्या जीवनात कधी न समाप्त होणारे फळ देतात. म्हणून असे म्हटले जाते की या दिवशी मनुष्य जेवढे **पुण्य कार्य व दान धर्म** करतो त्याचे शुभ फळ त्याला निश्चितच मिळते.

### अक्षय तृतीया का साजरी केली जाते?

अक्षय तृतीयेला विवाहासाठी शुभ दिवस मानले जाते. ह्या दिवशी विवाह केल्याने विवाहित जोड्यांचे बंधन मजबूत राहते. अक्षय तृतीया साजरी करण्यामागे अनेक मान्यता आहेत. त्यातील काही प्रमुख ऐतिहासिक गोष्टी पुढील प्रमाणे आहेत:

१. असे म्हटले जाते की अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान विष्णूंचे अवतार भगवान परशुराम यांचा जन्म झाला होता.

२. अक्षय तृतीयेच्याच दिवशी आकाशगंगेत निवास करणारी पवित्र गंगा नदी राजा भगीरथांच्या तपामुळे भगवान शंकरांनी पृथ्वीवर पाठवली होती.

३. देवी अन्नपूर्णेला देवी पार्वतीचे रुप मानले जाते, देवी अन्नपूर्णेचा जन्म अक्षय तृतीयेच्या या शुभ दिवशी झाला होता. या दिवशी लोक अन्नपूर्णा देवीची पूजा करून गरिबांना दान देतात.

४. दक्षिण भारतातील मान्यतेनुसार अक्षय तृतीयेच्या दिवशी देवी लक्ष्मीने कुबेराच्या तपाने प्रसन्न होऊन त्यांना धनाचे देवता बनवले होते. म्हणूनच या दिवशी लक्ष्मी यंत्र आणि भगवान कुबेराची देखील पूजा केली जाते.

५. महाभारतामध्ये देखील अक्षय तृतीयेचा उल्लेख सापडतो. महर्षी वेद व्यास यांनी याच शुभ दिवशी महाभारत लिहिण्यास सुरुवात केली. युधिष्ठिराला अक्षय तृतीयेच्या दिवशी 'अक्षय पात्र' वरदान म्हणून मिळाले. वनवासा दरम्यान द्रौपदीचे भोजन होत नाही तोपर्यंत या अक्षय पात्रातील अन्न संपत नसे.

६. एका कथेनुसार असे ही म्हटले जाते की अक्षय तृतीयेच्या याच शुभ दिवशी भगवान कृष्ण आणि सुदामा यांची भेट झाली होती.

७. भविष्यपुराण नुसार अक्षय तृतीयेच्या दिवशी सतयुग आणि त्रेतायुग चा आरंभ झाला होता.

## अक्षय तृतीयेची पूजन विधि:

या दिवशी भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मीच्या पूजेचे महत्व आहे. या दिवशी देवी लक्ष्मी आणि विष्णु भगवानांची पूजा करून त्यांना तांदूळ चढवले जातात. पुजेनंतर तुळशीच्या पानासोबत त्यांना भोजन दिले जाते. सर्व पूजा झाल्यावर दीप, धूप, अगरबत्ती लावून आरती केली जाते.

## अक्षय तृतीयेचे उपाय:

या दिवशी केलेले दान, हवन, तर्पण, पूजा, जप इ. पुण्यकर्म अक्षय्य टिकते म्हणून ‘अक्षय्यतृतीया’ ही शुभतिथी प्रमाणे पितृतिथी आहे.या दिवशी गंगास्नान, यज्ञ होम, यवदान, यवभक्षण करावे. **म्हणून असे म्हटले जाते की या दिवशी दान केल्याने त्याचे फळ लवकर प्राप्त होते. शुद्ध मनाने केलेले दान अधिक फलदायी असते.**

**आजच्या पवित्र अशा दिवशी आई भगवतीच्या चरणी दान अर्पण करण्यासाठी खाली दिलेल्या QR कोडला स्कॅन करा किंवा SBI Portal / Online Website Payment लिंक्सवर क्लिक करा:**

Scan and Pay with any BHIM UPI app

PhonePe | Whatsapp | Freecharge | Google Pay | Paytm

HDFC bank | SBI pay | ICICI Bank | Axis pay | My airtel

Payment Via
**SBI Portal**
PAY NOW

Payment Via
**Online Website Portal**
PAY NOW

Q57708486@ybl

**आई भगवतीच्या चरणी कमीत कमी रुपये १०१/- पासून सुरुवात करून आपण देणगी देऊ शकता.**

**Source:** *https://www.bhashanmarathi.com/2020/12/Akshaya-tritiya-importance-in-marathi.html*

# निधीचा तपशील

| अ.नं. | निधी | Funds |
|---|---|---|
| १ | मंदिर जीर्णोद्धार निधी | Temple Restoration Fund |
| २ | इमारत निधी | Building Funds |
| ३ | मेडिकल निधी | Medical Funds |
| ४ | जीवनदान निधी | Life Base Support Fund |
| ५ | इतर निधी | Other Fund |

# देणगीचा तपशील

| अ.नं. | निधी | देणगी (₹) | Funds |
|---|---|---|---|
| १ | अन्नदान देणगी | - | Annadaan Donation |
| २ | इतर पूजा देणगी | - | Other Pooja Donations |
| ३ | **पंचामृत अभिषेक देणगी** | **₹ ३,१००/-** | Panchamrut Abhishek Donation |
| ४ | नंदादीप (तेल) देणगी (१५ दिवस) | ₹ ७०१/- | Nandadeep (Oil) Donation (15 Day) |
| ५ | नंदादीप (तेल) देणगी (८ दिवस) | ₹ ५०१/- | Nandadeep (Oil) Donation (8 Day) |
| ६ | नंदादीप (तेल) देणगी (१ दिवस) | ₹ १०१/- | Nandadeep (Oil) Donation (1 Day) |
| ७ | **नंदादीप (तुप) देणगी (८ दिवस)** | **₹ ५०१/-** | Nandadeep (Ghee) Donation (8 Day) |
| ८ | दुग्ध अभिषेक देणगी | ₹ ३५१/- | Dugdh Abhishek Donation |
| ९ | ओटी पूजा साहित्य देणगी | ₹ ३०१/- | Outi Pooja Sahitya Donation |
| १० | संपुष्टीत पाठ्पुजा | ₹ ४०१/- | Sampushtit Pathpooja Donation |
| ११ | पल्लव पाठ पूजा देणगी | ₹ ३०१/- | Pallav Pathpooja Donation |
| १२ | सप्तशती पाठपूजा देणगी | ₹ २०१/- | Saptashati Pathpooja Donation |
| १३ | अभिषेक देणगी | ₹ १५१/- | Abhishek Donation |
| १४ | महानैवेद्य देणगी | ₹ १५१/- | Mahanaivedya Donation |

**Note: 80G Receipts is not available for religious objects like Pooja, Mahapooja or Abhishek**

देणगी

**एक देणगी श्री सप्तशृंगी निवासिनी देवी चरणी अर्पण**